


# उफाळलेल्या भावनांच्या कविता

संकेत शिरसाठ

# उफाळलेल्या भावनांच्या
# कविता

## संकेत शिरसाठ

**कवी :संकेत बाबासाहेब शिरसाठ**

ई - मेल : sanketshirsath13@gmail.com

LinkedInaccount: https://www.linkedin.com/in/sanket-shirsath-1483261aa

मोबाईल क्रमांक : 9075840957

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य. चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन :  २७ ऑगस्ट २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

## संकेत बाबासाहेब शिरसाठ



जन्म तारीख : 01 /03 /2000

प्राथमिक शिक्षण: गाढे वस्ती शाळा व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोल्हार खुर्द ता. राहुरी.

माध्यमिक शिक्षण: न्यु इंग्लिश स्कूल, कोल्हार बुद्रुक , ता. राहता , जि. अ. नगर.

उच्च माध्यमिक शिक्षण : महात्मा गांधी ज्युनियर कॉलेज , प्रवरानगर .

महाविद्यालयीन शिक्षण : पद्मश्री विखे पाटील कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स, ,प्रवरानगर, लोणी.

ई - मेल : sanketshirsath13@gmail.com

LinkedInaccount: https://www.linkedin.com/in/sanket-shirsath-1483261aa

मोबाईल क्रमांक : 9075840957

मी सध्या महाविद्यालयीन शिक्षण घेत आहे. तृतीय वर्ष - रसायनशास्त्र विषयात पदवीचे शिक्षण घेत आहे. कविता लिहिण्याची आवड इयत्ता सहावीत असताना निर्माण झाली. "मी एक विद्यार्थी" ही पहिली लिहिलेली कविता. समाजात वावरताना मला अनेक प्रश्न पडतात, आणि त्यातूनच " कविता उफळलेल्या भावनांच्या " उदयास आल्या.

*अर्पणपत्रिका *




"ज्यांनी मला वाचन - लिखाणाची
आवड निर्माण करून दिली
ते माझे स्वर्गीय आजोबा ."



1) एक विद्यार्थी

शाळेत जातो ,
जाऊन शिकतो ,
शिकून मोठा होण्याचे , स्वप्न मी
पाहतो .
मैदानावर जातो ,
जाऊन खेळतो ,
खेळून मोठे खेळाडू होण्याचे , स्वप्न
मी पाहतो .
मंदिरात जातो ,
तेथे देवाच्या मूर्तीचे दर्शन मी घेतो ,
देवात्म्याचे दर्शन व्हावे असे , स्वप्न
मी पाहतो.
आकाशाकडे पाहतो ,
पाहतच राहतो ,
त्याच्या एवढे कीर्तिमान होण्याचे ,
स्वप्न मी पाहतो .
आभाळाकडे पाहतो ,
दिसतात पक्षी ,
पक्षी होऊन आकाशी उंच भरारी



घेण्याचे , स्वप्न मी पाहतो .
सूर्याकडे पाहतो ,
डोळे दुखू पर्यंत पाहतच राहतो ,
त्याच्या एवढे प्रकाशमान होण्याचे ,
स्वप्न मी पाहतो .
नदीकिनारी जातो ,
जाऊन उभा राहतो ,
माशासारखे पोहण्याचे , स्वप्न मी
पाहतो .
समाजात जातो ,
जाऊन समाजाचे निरीक्षण करतो ,
आत्मविश्वासाने  जगण्याचे, स्वप्न
मी पाहतो .
माझ्या मनात प्रश्न असतात हजार ,
प्रश्नांची उत्तर शोधण्याचा प्रयत्न
करतो मी अपार ,
मला माझ्या प्रश्नांचे उत्तर मिळण्याचे
, स्वप्न मी पाहतो .

## 2) आनंद



आनंदाने चला जगूया ,
आनंदाने चला जगूया॥
आनंदाने आपण राहू,
आनंदाने आपण गाऊ,
आनंदाने चला जगूया ,
आनंदाने चला जगूया ॥

आनंदाने काम करू,

आनंदाने काम स्वीकारू ,

आनंदाने खेळ खेळूया,
आनंदाने खेळत राहू,
आनंदाने चला जगूया ,
आनंदाने चला जगूया ॥
आनंदाने शिक्षण घेऊ,

आनंदाने शिक्षा पचवू,

आनंदाने चला जगूया ,
आनंदाने चला जगूया ॥

आनंदाने कष्ट करू,

आनंदाने फळ खाऊ ,

आनंदाने चला जगूया , आनंदाने

चला जगूया ॥





## 3) सायंकाळ

सायंकाळ झाली आता सायंकाळ झाली,

पक्षी आपली हो..... पक्षी आपली हो.....

घरे शोधत निघाली.....

कावळा  कोकतो कावऽऽ  कावऽऽ
चिमणी करते  चिवऽऽ चिवऽऽ

आता पक्षांचा थवा  जसा तुटला रे,

पसारा हा मोठा झाला रे,

सूर्या आता मावळला रे,

अंधार आता पडला रे,

अंधार पडण्याच्या आधी,
शेतकरी शेतातील  कामे आटोपून घरच्याला निघाला   रे.

4) हास्याचे गाणे

हसणं हे एक गाणंच असतं ,

ते आपल्याला मिळालेल  एक वरदानच असतं ,

कुणाला सुंदर तर कुणाला अतिसुंदर ,

अस कुणीही नाही की ते जीवनात हसतच नाही,

हसणं हे कुणाच्या मनाला मोहणारं असतं ,

तर ते कुणाला आनंद देणारं असतं ,

हसणं कधी सुखात येत,

तर ते कधी दु:खात येत,

हसणं हे वेड्यावर  येत ; तर ते हुषारावरही  येतं ,

हसणं गंमती सांगितल्यावर येतं,

तर ते कधी गंमत ऐकल्यावरही येतं,

हसणं हे एक गाणंच असतं,

हसणं हे एक गाणंच असतं,

हसणं हे हसणंच असतं ,

हसणं नसतं तर काहीच नसतं ,हसणं हे
दु:ख गेल्यावरच मिळतं ,
म्हणूनच प्रत्येकाच्या मनात सळसळतं ,
ज्याला 'हसणं' काय ? हे कळत,
तेच तर पुढं ढळत  .

## 5) मानवाचे रूप

कुणालाही लाभत नाही एकमेकांसारखे,

कोणतेही असो, कसेही असो, सर्व
देवासारखे .

विनोद केल्यावर हसे,

मन दुखावल्यावर , सर्वांवर रूसे,

कुणाला हसवते ,तर कुणाला रूसविते,

कुणाला आनंद, तर कुणाला दु:ख देत.

आनंदात देवाला विसरते ,

दु:खात देवाला विचारते.

मानवाचे रूप किती वेगळेच आहे,

माझ्या मते खुप मोठे निराळेच आहे,
मानवाचे रूप हे, मानवाचे रूप हे...

6) मार्ग

ज्या पथावर  आहे माणूस,
तो आहे खुप दु:खाचा ,
कोणता मार्ग  निवडावा ,
हे कळत नाही रे त्याला.
या पथात गुरफटल्यावर ,
सुटका नाही रे त्याला,
कोणता मार्ग निवडावा ,
हे कळत नाही रे त्याला.
सुख आहे रे मिनिटाचे ,
दु:ख आहे रे जीवनाचे
कोणता मार्ग निवडावा ,
हे कळत नाही रे त्याला.
जो आहे आज मित्र  सोबती,
तोच बनेल उद्या पक्षपाती ,
कोणता मार्ग निवडावा ,
हे कळत नाही रे त्याला.  .



7) पतंगाची कमाल

शेजारच्या  मुलाने पतंग उडवली,
मला उडविता नाही आली,
त्याची पतंग वर  वर  गेली,
माझी पतंग खालीच राहिली.
क्षणात खाली, क्षणात वर ,घिरट्या घेतच राहतो,
पतंग आपली मजा करून घेतच राहतो,
पतंगाला शेपूट  जोडून, शेपूट  सळसळत राहते ,
तीच शेपूट पतंगाला  हळूहळू वर  घेऊन जाते ,
पतंग उडविण्यात माझा पूर्ण   दिवस  गेला,
तरीही पतंग उडविता येईना बरका मला,
पतंगाने वर जाऊन खुप मजा केली,
माझीही दिवसभर खुप फजिती झाली.
पण खुप प्रयत्न करून मला पतंग उडविता नाही आली ,
उन्हात पतंग उडविण्याच्या प्रयत्नात वाईट दशा झाली.

## 8) रात्रीचा पाऊस

अंधाऱ्या रात्री,
हवेच्या  कात्री,
वाऱ्याची धुंद ,
झाडांची झुंज,
पडले जे पानावर,
उमटेल ते कानावर,
वारा जात होता चालून,
झाडांना साद घालून,
चांदण्या लागल्या पळू,
थेंब लागले गळू,
क्षणात वारा ,
क्षणात धारा,
इतका पावसाचा मारा,
असाच चालू होता आनंद सारा...

9) पावसाची मजा

उडाली धांदल माणसांची,

प्राण्यांची, पाखरांची.

आडोसा कुठेही लाभेना,

मध्येच अडकल्यावर मजा येते हो यांची.

आंघोळ घातली आल्यावरती,

सगळ्या झाडा झुडपांना.

पुन्हा एकदा बहरण्यास,

सडा टाकला मळ्यातील त्या रानांना.

मध्येच वाटले जातो आता,

कळेनासे झाले मला.

पुन्हा अचानक सरसर आला,

भरपूर आनंद मला झाला.

टपटप आवाज कानी येतो,

मनाला माझ्या मोहुन जातो.

आला तर बरसत राहतो,

सगळयांना आनंद देतो.

गेल्यावरती सुगंध दरवळे ,

मन माझे खुप तळमळे.

नदी-नाल्यांतील पाणी खळखळे,
आनंद प्रत्येकात सळसळे .

.





## 10) पाऊस

पाऊस जोरजोरात वाजतो ,
झाडांना हलवून सजवतो ,
झाडं लागले हलायला जोरात,
पाऊस चालला आपल्या तोरात.
प्रत्येकाच्या मनात
झाल सुरूच वादळं,
सगळीकडे चालू झाली ,
प्रत्येकाची धावपळ.
पावसाचा थेंब पडला की,
आवाज येतो कानी,
पावसाची येणारी प्रत्येक सर,
करती आपली मनमानी.
पावसाची खुमासदारी
कळणार नाही आता,
पावसासंगे वीज चमकली की
घाबरणार नाही आता.

11) ताईची आठवण

ताई बसते आता हातात घेऊन मोबाइल,

विसरली आहे ती, उघडायला तिच्या कॉलेजची फाईल.

आता का नाही निघत घराबाहेर फिरायला ,

आता तरी येईल का ती मला खेळात हरवायला.

ताई म्हणते काही झाले नाही मला,

पण हात का लावत नाही ती त्या मोगऱ्याच्या फुलाला.

मी तिला म्हणतो ,"मनात काय चालू आहे गं ताई",



ती म्हणते " काही चालू नाही, काही चालू नाही."

काळात बदल होतो तशीच ती बदलतेय ,

मनात असलेल्या गोष्टींना ती कायमच हलवते.

ताई ची आठवण म्हणून लावले मी आणि बाबांनी रोप,

आम्हा दोघांना माहित  होतं की ताई घेत असेल आता दुपारची झोप  .

.

.     .



12) सुख

सुखात सुख सुखातले,

रंग त्याचे निळे पिवळे ,

सागळीकडेच असते सावळे.

सुखाचे असतात क्षण फार कमी,

तेच येतात आपल्या जीवनात कामी,

त्याचा आस्वाद घेतला तर जीवनच होऊन जाते नामी.

सुख म्हणजे मनाला मिळालेल धन ,

प्रत्येकाचे मन होऊन जाते खरोखरचेच मन,

अन् प्रत्येकालाच लाभत नाही हे धन .

सुख प्रत्येकाचे कशा कशात,

देव करणार का खुशामत,

अशी अपेक्षा असते प्रत्येकात.

सुखातील मिळणारी  भरारी,

मिळताच का प्रत्येकाला खरोखरी,

मग तुम्ही नक्कीच करा या सुखाची सफारी.

.

.



13) समज

प्रत्येक मनुष्य असतोच का समजदार ?

प्रत्येक मनुष्यातच गुण असतात का खुमासदार ?

समजून घेणे ही गोष्ट वेगळी असते ,

आणि समजावून सांगणे वेगळे असते.

समजावण्याची कला कुणा एकातच असते ,

समजून घेणारा कलावंतच असतो.

समजावून सांगणारे समजावून समजावून फसले,

नासमजदार टाळत टाळत कायमच हसले.

कायम कायम समजावून सांगणारा वेडा नसतो,

नासमजदार वेड्यासारखा हसतच राहिला तर
जीवनातच फसतो.

समजदारची मान कायमच असते ताठ,

नासमजदाराची कायम दुखतच असते पाठ.

"समज-समजा-समज" होतील गैरसमज,

ज्याला वरचे कळत नाही तोच नासमझ .

14) दुनिया

काय या दुनियेची कमाल,

करते कायमच धमाल,

आणि प्रत्येक माणूस आहे या दुनियेचा मालामाल.

काय ही दुनिया आहे निराळी,

या दुनियेची सगळी रीत वेगळी,

या दुनियेवर जमेल का आता निवळी ,

चाऊ माऊ म्हणत दुनिया तयार झाली,

झाली रे झाली पूर्ण तयारी झाली,

नव्या दुनियेची नवी पहाट पुन्हा माहेराहून आली.

गुरफटली आहे दुनिया माझी आता,

कधी येणार आहेस सोडायला माझ्या नाथा ,

मार बरका आता त्या सर्व दुष्टांना लाथा,



मग गायील मी माझ्या तोंडून तुझी गाथा

.

दुनियेच्या  या जंजाळातून मुक्त कधी करशील रे बाबा,

मुक्त होऊन पुन्हा या दुनियेत येऊशी वाटेल का रे बाबा,

मग पुन्हा माझ्या डोळ्यात अश्रु दाटेल का रे बाबा.

.

.

.



## 15) बिघडलेला समाज

इकडून आली गाडी,
तिकडून आली गाडी,
आता तर चढत आहे माडीवर माडी.
कोणत्याही मुद्द्यासाठी करूया आता पर्व
या मित्रांच्या सहवासात बिघडले आहेत सर्व
बिघडला आहे समाज,
त्यालाच आहे खपू साज,
आहे त्याला त्याच्या या वागण्यावर नाज.
छोटा-मोठा आता राहिला नाही कुणी,
या सगळ्यात सगळेच झाले आहेत धनी,
आता कोणीच नाही कोणाच्या ध्यानीमनी.
एकमेकांविरूद्ध बोलण्याचे ठरले,
अनेक प्रश्नांनी प्रत्येकालाच घेरले,.
आता कळत नाही कुणी कुणाला धरले,
आणि कोणी कोणाला सोडले.
चोर झाला तो, चोरी करतो जो.
चोरी करता करता , ढेर झाला तो.
ढेर झाला तो.
.

## 16) विचारून बघा

कुणा कुणाला काय विचारा,

कधी उत्तर मिळत  नाही,

जरी उत्तर दिले  कोणी,

तरीही सांगेल का बरोबर,

आणि ती असेल का खरोखर.

त्या आभाळाला विचारा पाऊस पडले का रे?

त्या देवाला विचारा दगडाच्या बाहेर येशील का रे?

त्या माणसाला विचारा तुझी माणुसकी कुठे गेली रे?

काट्याला जाऊन विचारा,

माझ्या मनाला तर टोचणार नाही ना रे?

त्या जमिनीला जाऊन विचारा,

माझा तुला भार तर होत नाही ना रे?

त्या औषधाला जाऊन विचारा,

तू माझा प्रत्येक आजार बरा करशील का रे?

त्या भाकरीच्या तुकड्याला विचारा,

माझी भूक भागवशील का रे?

त्या एका श्वासाला विचारा,

माझे प्राण जपून ठेवशील का रे?

त्या आत्म्याला विचारा,

माझे शरीर सोडणार तर नाही ना रे?

त्या झाडालाही विचारा,

तुला फळ येईल का रे?

त्या पाण्यालाही विचारा,

माझी तहान भागवशील का रे?

त्या सूर्यालाही  विचारा,

माझे जीवन  प्रकाशित करशील का रे?

त्या घड्याळालाही विचारा,

मला तुझ्या सोबत घेऊन जाशील का रे?

त्या स्वप्नांना विचारा ,


पूर्ण होतील का रे?

त्या मनाला विचारा,

तृप्त होशील का रे?

हा उत्तर देईल का रे?

तो उत्तर देईल का रे?



## 17) उन्हाळ्याची सुट्टी

उन्हाळ्यात तहान लागल्यावर माठातच ग्लास बुडविणार,

सकाळी सकाळी उठलो तरी गार पाण्याने आंघोळ करणार,

उन्हातानातच भर दुपारी आम्ही खेळायला घराच्या बाहेर पडणार,

जेवण करतानाही आम्ही आंब्याच्या झाडाच्या कैरीची खाप नक्कीच खाणार,

घराच्या बाहेर अंगणात  खेळताना आम्ही कधीच चप्पल नाही घालणार,

प्रत्येक दिवशी वाद घालायला आम्ही कधीच नाही भिणार

दिवसाच्या कोणत्याही वेळी मनात आले तर काम करणार म्हणजे करणार,

शाळेचा विसर , अभ्यासाचा नाथ दोघांना लांब सोडणार,<br>
अन् उन्हाळ्याच्या उन्हाने भरलेल्या सुट्टीची पूर्ण  मजा घेणार  .....

## 18) राजकारण

प्रत्येक नेता साजरी करतोय आपली
नेतागीरी ,

पण आता माणसाला अनुभवावी  लागत
आहे दादागिरी.

काही भरतात खिशे, काही पाळतात
ससे,

काहींना हे जमत नसल्यामुळे ते
समाजसेवेत दिसे.

प्रत्येकाच्या वरवर असतो तो देणारा
लगाम,

त्यामुळे प्रत्येकच प्रत्येकाचा असतो या
राजकारणात गुलाम.

काही तर इकडे तिकडे  पाहून नोट घेतात
हातात,

काही तर कुठेच न पाहता ठेवून देतात
खिशात .

टेबला खालून होतात आता कामे सर्वच,

जसे या माणसांनी कायमचेच घेतले आहे पर्वच .

सध्याला सगळीकडे कार्यक्रमात  हे करतात वृक्षारोपण,

आपल्या कामाला पूर्णविराम  देऊन दुसऱ्यांवर करतात दोषारोपण.

पारतंत्र्य पूर्वी परवडत नव्हते.

पण आता पारतंत्र्य परवडले असते असे म्हणायला हरकत नाही,

देशाला स्वातंत्र्यं मिळून दिलेल्यांनीच राजकारण साकारले पण आता या राजकारणाला अर्थ आहे काही  .

.

## 19) सांजकाळची कविता

कवितेसाठी विषय आठवेनासा  झाला,

प्रभाकर मात्र मावळतीला गेला,

सगळीकडचे इथुन  तिथपर्यंत  काळोख झाला.

सर्व झाडे झुडुपे  पशु पक्षी शांत झालेले,

बैलगाडी वर आलेले ते बाबा शेतातील काम झाल्यावर परतीला गेलेले,

अंधार झाल्याने सगळीकडेच  प्रकाशाचे दिवे लागलेले.

आभाळाला काळे करताना त्यातून हिरे चमकायला लागलेले,

ते समोरचे मोठे बदामाचे झाड दृष्यात जमिनीकडे बघितलेले ,

माझे हे लिहून  झाल्यावर माझे ते मन तृप्त झालेले.



20) काल होती चिमणी

आवाज येतो कानी,

म्हणूनच हिंडतो रानी,

हिंडता  हिंडता  राहत नाही मन माझे
ध्यानीमनी.

काल दिसली होती ती उडणारी चिमणी,

इकडून तिकडे तिकडून इकडे उडून
जाण्याची करत होती मनमानी ,

आवाज येतो कानी,

म्हणूनच हिंडतो रानी.

कायमच येत असते आमच्या
पाणवठ्यावर वापरण्यासाठी पाणी,

अंगणात पडलेले धान्य गोळा करते जसे
मौल्यवान नाणी,

आवाज येतो कानी,

म्हणूनच हिंडतो  रानी.

चिवऽऽ चिवऽऽ  करत उडत असते
दिवसभर पण,

येत असेल ना तिलाही  कधीकधी
ग्लानी,



आवाज येतो कानी,

म्हणूनच हिंडतो रानी.



आज काही आवाज आला नाही,

म्हणून मी पण रानात गेलो नाही,

कदाचित चिमणी ही आज आली नाही,

आणि म्हणूनच पाणवठ्यावरील पाणी
प्याली नाही.

.                    .

21) गणित आयुष्याचे

आयुष्य आहे तर,

आयुष्याचे गणित तर असणारच.

ते गणित कठीण असो,

वा सोपे आपण ते सोडणारच.

गणित सोडवल्यावर,

आपल्याला त्याचं उत्तरही मिळणारच .

आयुष्याच्या गणितात भागाकार
गुणाकार नाही पण,

सुख वजा केले तर बाकी दु:ख असतं .

कितीतरी गुणिले कितीतरी,

अशी आकडे मोड तर यात मुळीच
नसते.

याचे गणित ज्याला सोडवता येते तोच
पुढे चालतो पण,

ज्याला आयुष्याचे गणितच कळत नाही,

त्याची गाडी मध्येच रुळावर फसते .

गणितातील गणित मोठे,

आयुष्याचे गणितच खोटे,

यात असतात खपू काही काटे,

पण गणित कळले की आपोआपच
तुटतात नवनवीन  फाटे.



22) प्रत्येक गुन्हा करणारा गुन्हेगारच नसतो.....

टपून बसने नाही गुन्हा,

प्रत्येक टपनारा गुन्हेगार.

चोरी करणे नाही गुन्हा,

प्रत्येक चोरी करणारा गुन्हेगार.

वेळ  नसणे नाही गुन्हा,

वेळ  वाया  घालवणारा गुन्हेगार.

काटा टोचणे नाही गुन्हा,

त्यावर पाय देणारा गुन्हेगार.

काम करणे नाही गुन्हा,

प्रत्येक कामचुकार गुन्हेगार.

हसत बसणे नाही गुन्हा,

प्रत्येक हसणारा गुन्हेगार.

रडत बसणे नाही गुन्हा,

प्रत्येक रडणारा गुन्हेगार.

अन्याय करणे नाही गुन्हा,

अन्याय सहन करणारा गुन्हेगार.

या जगात जगणे नाही गुन्हा,
प्रत्येक जगणारा गुन्हेगार .



23) रात्र काळोखाची

रात्र झाली काळोखाची,

आयुष्याच्या अंधाराची .

पाऊल पडले अदृश्य,

काळ्या वाटेवरती .

पहाट येईल सदृश्य,

प्रकाशाचे फाटे पडती.

धार धार झाला अंधार ,

प्रकाश प्रकाश जीवनाचा आधार,

प्रकाशावरती अंधाराचा भार,

अंधारातूनच उघडे प्रकाशाचे दार.

.

.

.



24) नवे-जुने

एक काहीतरी नवीन ,

एक काहीतरी मलिन ,

प्रकाश नवा , मार्ग नवा ,

सर्वांमध्ये पसरतोय एक संसर्ग .

कुठेतरी ,काहीतरी ,कधीही,

सापडत होतात आधीही,

अस्तित्वाचे तत्व रममाण ,

एकमेकांना त्यांचे फरमान.

समर ,शीत एकाजागी,

स्थिती सांबर वाघामागी,

अर्थरुपी तेज बहरला ,

पुण्यवृत्ती पाप पसरला.

ज्ञानात अधिक विचार = ज्ञानाचार,

कुअचार घडून मतविकार,

गती निकट समृद्ध  समाज,

उदरापरी द्वंद्व कार्यकाज .

ध्यानलागी प्राप्तता सुंदर,

मस्तिष्क  आपलीच कदर,

सूत्र -  साखिळ कर्म  योग्य,

फक्त देईल का वैराग्यं ?

विचार नवा  नवा  हाती घट्ट धरा,

तत्त्वज्ञान तत्वेतन  धारण करा ,
जनकांना जनकांशी घट्ट धरा,
नवे -जुने करणाऱ्यांनी मागे सरा ....
.
.

## 25) काहीच नको असे नाही




शब्द -शब्दांतली,
गुंतागुंत नको.
वाक्य वाक्यांतली ,
ओढा ताड नको.

विचार -सद्विचार,
हवा मला.
मोकळा निरागसपणा,
हवा  मला.

देश -देशातला,
विवाद नको.
जग -जगातला,
संघर्ष  नको.

जन जनतेतला विकास,
हवा  मला.



मार्ग सरळातलाच ,

हवा मला.

हक्क -हक्कातला,

दृष्ट नको.

जाब- जबाबातले,

कारण नको.

तत्पर कर्तव्य ,

हवे मला .

सत्य सत्यातले,

हवे मला.

26) विवादाला साद

वाद-विवाद वाद-विवाद,

होत आहे एकमेकांमध्ये संवादातून विसंवाद,


बाजू मांडून होत नसतो कोणी मोठा,
कारण बाजू विरहित बोलणारा ही आपल्या
बुद्धीत करून आलेला असतो  साठा .

विचार तर तुझे वेगळे, त्याचे तर खूपच निराळे,
तुही सांगणारा आणि तोही सांगण्यासाठीच
तळमळे,
थोड छोट सत्य तुझ थोड गोड खोटं त्याचं ,
श्रोते तर फक्त टीका करतात ऐकून तुझं नि त्याचं.
टाळ्या वाजतात , गडगडाट होतो ,
खऱ्या-खोट्याची जो सांगड घालतो,
तोच तर या स्पर्धेचा विजेता बनतो ,
तर बाकी राहिलेला उपविजेता बनतो.
मनातल्या मनात विचार माझे ,
गुंतागुंतीत अडकवून घेतलेले ठेवून मी घेतो .
सडपातळ विचार माझे मीच म्हणून घेऊन ,

पण समोर मांडण्यासाठी कविता मी तयार करतो .

## 27) विचार

विचार नसेल स्पष्ट ,
होईल केव्हाही नष्ट ,
विचार करणार नाही ,
तो राहणार का कधी तटस्थ ?
विचार व्यक्तीचा खोटा ,
होणार नाही तो मोठा ,
कमकुवत बढती मिळेलही ,
होणार का तो कधीही श्रेष्ठ ?
विचार झाला कुविचार ,
आत्म्यात नाही येणार सुविचार ,
अविचाराचे आचरण केले ,
स्थान मिळेल त्याला कधी वरिष्ठ ?
विचार तो लुबाडण्याचा ,
खेळ करणे आयुष्याचा ,
स्वार्थात दुसऱ्याला इजा ,
चुकतील का त्याला कधी कष्ट ?




## 28 )  गुदमरलेला श्वास

" क्षणातला क्षण जड जड वाटे ,
क्षण या जीवनातला नको ,
या क्षणामुळे मन माझे तडफडे ,
क्षण या जीवनातला नको . "
" "भावना मोडल्या मनातल्या ,
आता मनही मोडाया लागले ,
मनासारखे मन हे माझे ,
आता मनंच नाही राहिले ."
"आनंद मिळे न कशात ,
दुःख मानुन घेऊ कशाचे ,
समजत नाही भेद यातला ,
फक्त शुन्यच माझ्या मनातला ."
"फक्त चंद्राकडे बघावे ,
मनामध्ये कुझावे ,
चंद्र येइल माझ्या घरला ,
मला बरोबर घेऊन जायला ......."
.



## 29 )   माझे ते माझे , अन् तुझेही माझे

भारत महान घडला तेव्हा ,
' महाभारत ' घडले जेव्हा ,
रक्त ज्या  मातीत उगले ,
त्याच मातीत जाईल मुरले .
प्रकाशाचा थेंब मधोमध उभा ,
सर्वत्र अंधाराचा झरा या नभा ,
मार्ग शोधायचा या थेंबामधूनी ,
असेल जरी हा थेंब वेगळा सर्वांहुनी .
विजय मिळेल युद्ध समाप्ती ,
कराव्यात तर लागेलच काही विकृती ,
आता गगनात मावत नाही सागराचे डोहाळे ,
घटक घटकांचे राहिलेच सोहळे .
घडले महाभारत कशावरून  ?
आता सगळे उलगडले  ,
ते असे की " माझे तर आहेच माझे , पण तुझेही ही माझे
."



30 ) मी एक वेदनावान

हसव्या मनी ,
शब्द टिपूनी,
र[illegible]का करू नका मला तुम्ही .
शीत धमणी ,
सळसळ पळूनी ,
दुःखी करू नका मला तुम्ही.
तुटपुंजे विचार,
महती अपरंपार ,
त्रस्त करू नका मला तुम्ही.
एकच मी पण,
मनाचे नमन,
वेदना देऊ नका मला तुम्ही.

# उफाळलेल्या भावनांच्या कविता

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत. सूचना. टीका. विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

